**भारत-मध्य आशिया संवादाची 4थी बैठक**

04 जून 2025

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ.एस.जयशंकर हे भारत- मध्य आशिया संवादाच्या 4 व्या बैठकीसाठी कझाकिस्तान, किर्गिझ, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांचे स्वागत नवी दिल्ली येथे 6 जून 2025 रोजी करतील. डिसेंबर 2021 मध्ये नवी दिल्लीमध्ये भारताने संवादाच्या 3 ऱ्या बैठकीचे आयोजन केले होते.

2. भारत आणि मध्य आशिया परस्परांचे 'विस्तारित शेजारी' आहेत. गेल्या हजारो वर्षांपासून सांस्कृतिक, नागरिक परस्पर आदान-प्रदानावर आधारित मैत्रीपूर्ण आणि सौहार्दपूर्ण समकालीन राजनयिक संबंध जपले आहेत. जानेवारी 2022 मध्ये पहिल्या भारत-मध्य आशिया आभासी शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परराष्ट्र मंत्र्यांच्या स्तरावरील भारत-मध्य आशिया संवादाच्या यंत्रणेने या संबंधांमध्ये लक्षणीय प्रगती साधली गेली.

3. 4 थ्या संवादात, 6 जून 2025 रोजी मंत्री हे व्यापार, कनेक्टिव्हिटी, तंत्रज्ञान आणि विकास सहकार्यावर विशेष लक्ष केंद्रित करून भारत आणि मध्य आशियाई देशांमधील संबंध अधिक मजबूत करण्यावर चर्चा करतील. प्रादेशिक सुरक्षा आणि परस्पर स्वारस्याच्या प्रादेशिक व जागतिक विषयांवर देखील विचारांचे आदान-प्रदान करतील.

4. परराष्ट्र मंत्री हे फिक्कीच्या सहकार्याने MEA द्वारे 5 जून 2025 रोजी आयोजित भारत-मध्य आशिया व्यवसाय परिषदेच्या बैठकीतही सहभागी होतील.

5. भारत-मध्य आशिया संवाद हा भारत आणि मध्य आशियाई देशांच्या परस्पर हिताचे एक प्रकटीकरण आहे. जेणेकरु मैत्री, विश्वास आणि परस्पर समंजसपणाच्या भावनेने अधिक जवळची, व्यापक आणि मजबूत भागीदारी निर्माण करता येईल.

नवी दिल्ली

04 जून 2025